## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- १७०७/२०२२

**अपिलार्थी, श्री.किशोर एकनाथ पानसरे,**
मु.चरिव, पो.वेहलोळी, ता.शहापूर, जि.ठाणे.

विरुध्द

जन माहिती अधिकारी, उप वनसंरक्षक शहापूर यांचे कार्यालय, शहापूर-आसनगांव रोड, जुना आग्रा रोड, आसनगांव मु.पो.ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहायक वनसंरक्षक शहापूर यांचे कार्यालय, (वनीकरण व वन्यजीव), शहापूर-आसनगांव रोड, जुना आग्रा रोड, आसनगांव मु.पो.ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ०२.१२.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २८.०१.२०२० | -- | २९.०३.२०२२ | |

अपिलार्थी यांनी दि. ०६.०६.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *"माहिती न मिळाल्याने "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०२.१२.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" ऑफ लाईन केलेल्या कामाची सविस्तर माहिती मिळणेबाबत (निविदा जाहिरात, कामांची मागणी वर्क ऑर्डर, पास झालेल्या निविदा माहिती मिळावी.)"*

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना सुनावणीची सुचना प्राप्त होऊन देखील ते अनुपस्थित असल्याने, त्यांचे म्हणणे जाणून घेता आले नाही.

उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना विहित मुदतीत माहिती किंवा उत्तर दिलेले नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

तसेच, आता विद्यमान जन माहिती अधिकारी, यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

### आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी उप वनसंरक्षक शहापूर यांचे कार्यालय, शहापूर-आसनगांव रोड, जुना आग्रा रोड, आसनगांव मु.पो.ता.शहापूर, जि.ठाणे यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, उप वनसंरक्षक शहापूर यांचे कार्यालय, शहापूर-आसनगांव रोड, जुना आग्रा रोड, आसनगांव मु.पो.ता.शहापूर, जि.ठाणे यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २८.०१.२०२० रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात

येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२१.०१.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०२ डिसेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी, उप वनसंरक्षक शहापूर यांचे कार्यालय, शहापूर-आसनगांव रोड, जुना आग्रा रोड, आसनगांव मु.पो.ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१.

**- यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी,
उप वनसंरक्षक शहापूर यांचे कार्यालय, शहापूर-आसनगांव रोड,
जुना आग्रा रोड, आसनगांव, मु.पो.ता.शहापूर,
जि.ठाणे ४२१ ६०१. **यांचे मार्फत रवाना.**

**सुनावणी दिनांक २१.०१.२०२६ ( In Continuation of order dt.०२.१२.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.०२.१२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविणेबाबत व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २१.०१.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत(कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश बाळू गोसावी, वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, शहापूर उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांना अद्यापपर्यंत माहिती देण्यात आलेली नाही.

आयोगाने दि.०२.१२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.प्रकाश रामचंद्र चौधरी, वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, शहापूर यांचा माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबाबतचा खुलासा मागविण्यात आला होता. तथापि त्यांनी कोणताही खुलासा सादर केलेला नाही. सबब त्यांना खुलासा सादर करण्यासाठी एक संधी देण्यात येत आहे. त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी त्यांचा खुलासा सादर करणे योग्य होईल.

तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश बाबळू गोसावी, वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, शहापूर यांनी आयोगाच्या दि.०२.१२.२०२५ रोजीच्या आदेशाप्रमाणे अपिलार्थी यांना अद्यापपर्यंत माहिती दिलेली नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश बाबळू गोसावी, वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, शहापूर यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २८.०१.२०२० रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन आयोगाच्या दि.०२.१२.२०२५ रोजीच्या आदेशानंतरही माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.प्रकाश रामचंद्र चौधरी, वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, शहापूर यांनी आयोगाच्या दि.०२.१२.२०२५ रोजीच्या आदेशाप्रमाणे माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबातचा कोणताही खुलासा सादर केलेला नाही. त्यांना त्यांचा खुलासा सादर करण्यासाठी एक संधी देण्यता येत आहे. त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाच्या दि.०२.१२.२०२५ रोजीच्या आदेशाप्रमाणे त्यांचा लेखी खुलासा स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.११.०३.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ जानेवारी, २०२६ .

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.प्रकाश रामचंद्र चौधरी, वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, शहापूर, शहापूर-आसनगांव रोड, जुना आग्रा रोड, आसनगांव, मु.पो.ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१.

**- यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश बाबळू गोसावी,
वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, शहापूर,
शहापूर-आसनगांव रोड, जुना आग्रा रोड, आसनगांव,
मु.पो.ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१. **यांचे मार्फत रवाना.**

**सुनावणी दिनांक ११.०३.२०२६ ( In Continuation of order dt.२१.०१.२०२६)**

**विवेचन**

उपरोक्त दि.२१.०१.२०२६ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये, याबाबतचा खुलासा सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ११.०३.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.प्रकाश रामचंद्र चौधरी (सध्या कार्यरत- वनक्षेत्रपाल, वन्यजिव वनक्षेत्रपाल काया्रलय वैतरणा) व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश गोसावी, वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल कार्यालय शहापूर उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश बाबळू गोसावी, वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, शहापूर यांनी अपिलार्थी यांना अद्यापपर्यंत माहिती दिलेली नाही. तसेच माहिती देण्यास झालेल्या विलंबासाठी त्यांनी कोणताही खुलासा सादर केला नाही. त्यांनी खुलासा सादर करण्यासाठी एक दिवसाच्या वेळेची मागणी केली आहे.

तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.प्रकाश रामचंद्र चौधरी, वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, शहापूर यांनी देखील त्यांचा खुलासा सादर केला नाही. त्यांनीही खुलासा सादर करण्यासाठी वेळेची मागणी केली आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरण तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांच्या खुलाश्यासाठी पुढील तारखेवर ठेवण्यात येत आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश बाबळू गोसावी, वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, शहापूर यांनी आयोगाच्या दि.०२.१२.२०२५ रोजीच्या आदेशानुसार अपिलार्थी यांना माहिती न पुरविण्यास झालेल्या विलंबाबातचा कोणताही लेखी खुलासा सादर केलेला नाही. त्यांना त्यांचा खुलासा सादर करण्यासाठी एक शेवटची संधी देण्यात येत आहे. त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून त्यांचा लेखी खुलासा सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.प्रकाश रामचंद्र चौधरी, वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, शहापूर यांनी आयोगाच्या दि.०२.१२.२०२५ रोजीच्या आदेशाप्रमाणे माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबातचा कोणताही खुलासा सादर केलेला नाही. त्यांना त्यांचा खुलासा सादर करण्यासाठी एक शेवटची संधी देण्यता येत आहे. त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाच्या दि.०२.१२.२०२५ रोजीच्या आदेशाप्रमाणे त्यांचा लेखी खुलासा स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१६.०३.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ११ मार्च, २०२६ .

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.प्रकाश रामचंद्र चौधरी(सध्या कार्यरत-वनक्षेत्रपाल, वन्यजिव वनक्षेत्रपाल काया्रलय वैतरणा), वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, शहापूर, शहापूर-आसनगांव रोड, जुना आग्रा रोड, आसनगांव, मु.पो.ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१.

**- यांना प्रत**
विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश बाबळू गोसावी,
वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, शहापूर,
शहापूर-आसनगांव रोड, जुना आग्रा रोड, आसनगांव,
मु.पो.ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१. **यांचे मार्फत रवाना.**

**सुनावणी दिनांक १६.०३.२०२६ ( In Continuation of order dt. ११.०३.२०२६)**

**विवेचन**

उपरोक्त दि.११.०३.२०२६ रोजीच्या आदेशान्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी व विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये, याबाबतचा खुलासा सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १६.०३.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.प्रकाश रामचंद्र चौधरी (सध्या कार्यरत-वनक्षेत्रपाल, वन्यजिव वनक्षेत्रपाल कार्यालय वैतरणा) वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल कार्यालय शहापूर उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश गोसावी, वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल कार्यालय शहापूर अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

सदर प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.प्रकाश रामचंद्र चौधरी (सध्या कार्यरत-वनक्षेत्रपाल, वन्यजिव वनक्षेत्रपाल कार्यालय वैतरणा) वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल कार्यालय शहापूर यांनी त्यांचा खुलासा सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांचा अर्ज कार्यालयात प्राप्त झाला होता तो कालावधी हा वित्तीय वर्षाचा शेवटचा महिना असल्याने, कामाचा व्याप होता. तसेच त्यांच्या बदलीमुळे अपूर्ण कामे पुर्ण करतानाचा ताण यामुळे सदर अर्जाची माहिती देणे राहून गेले असावे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.प्रकाश रामचंद्र चौधरी (सध्या कार्यरत-वनक्षेत्रपाल, वन्यजिव वनक्षेत्रपाल कार्यालय वैतरणा) वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल कार्यालय शहापूर यांनी अपिलार्थी यांना माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबाबत कोणताही निश्चित असा खुलासा केलेला नाही. त्यांनी असा अंदाज व्यक्त केला आहे की, शेवटचा महिना असल्याने व त्यांच्या बदलीमुळे अपूर्ण कामे पूर्ण करतानाचा ताण यामुळे अपिलार्थी यांना माहिती पुरविण्याचे राहून गेले असेल. या खुलाश्यावरुन असे स्पष्ट होते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबासाठी कोणतेही समर्थनिय कारण नाही.

तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश गोसावी, वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल कार्यालय शहापूर यांनी आयोगाच्या दि.११.०३.२०२६ रोजीच्या आदेशानुसार माहिती पुरिवण्यास झालेल्या विलंबाबाबतचा खुलासा सादर केला नाही. तसेच त्यांनी अपिलार्थी यांना माहिती देखील पुरविली नाही व ते आजच्या सुनावणीस उपस्थित देखील राहिले नाही. सबब त्यामुळे याप्रकरणात माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (३) (क) अंतर्गत चौकशी करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे. या चौकशीत साक्ष देण्यासाठी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश गोसावी, वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल कार्यालय शहापूर यांची उपस्थित आवश्यक आहे. त्यामुळे पुढील सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश गोसावी, वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल कार्यालय शहापूर यांचेवर समन्स बजावणे योग्य होईल. या समन्सची बजावणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शहापूर पोलीस स्टेशन, शहापूर व पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण यांचे मार्फत करणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.प्रकाश रामचंद्र चौधरी (सध्या कार्यरत-वनक्षेत्रपाल, वन्यजिव वनक्षेत्रपाल कार्यालय वैतरणा) वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल कार्यालय शहापूर यांनी सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून त्यांचा खुलासा अमान्य करण्यात येत आहे. त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्याकलम २० (१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस कायम करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्याकलम २० (१) अन्वये रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

   सदर रक्कम त्यांचे वेतनातून ०२ मासिक हप्त्यात वसूल करुन लेखाशीर्ष क्र.००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८०० - इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षा खाली जमा करावी. याबाबतची कार्यवाही करुन पूर्तता अहवाल सहाय्यक वनसंरक्षक, शहापूर वन विभाग यांनी आयोगास सादर करावा.

२. याप्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश गोसावी, वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल कार्यालय शहापूर यांची साक्ष घेणे अतिशय आवश्यक असल्याने, त्यांची उपस्थिती आवश्यक आहे. या चौकशी करिता उपस्थित राहणेस्तव उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठ यांनी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश गोसावी, वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल कार्यालय शहापूर यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (३) (क) अन्वये तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता अनुषंगाने आयोगास प्राप्त झालेल्या

अधिकाराचा वापर करुन पुढील सुनावणीस उपस्थित राहणेबाबत समन्स काढण्यात यावे. सदर समन्सची बजावणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शहापूर पोलीस स्टेशन, शहापूर व पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण यांचे मार्फत करावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२२.०४.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १६ मार्च, २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

१. उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

२. सहाय्यक वनसंरक्षक (जंकास व कॅम्पा) शहापूर, शहापूर आसनगांव रोड, जुना आग्रा रोड, आसनगांव, मु.पो.ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१.

३. आहरण व संवितरण अधिकारी, सहाय्यक वनसंरक्षक (जंकास व कॅम्पा) शहापूर यांचे कार्यालय, शहापूर आसनगांव रोड, जुना आग्रा रोड, आसनगांव, मु.पो.ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१.

४. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.प्रकाश रामचंद्र चौधरी(सध्या कार्यरत-वनक्षेत्रपाल, वन्यजिव वनक्षेत्रपाल कार्यालय वैतरणा), वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, शहापूर, शहापूर-आसनगांव रोड, जुना आग्रा रोड, आसनगांव, मु.पो.ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१.

**- यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश बाळू गोसावी,
वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, शहापूर,
शहापूर-आसनगांव रोड, जुना आग्रा रोड, आसनगांव,
मु.पो.ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१. **यांचे मार्फत रवाना.**

## सुनावणी दिनांक २२.०४.२०२६ ( In Continuation of order dt. १६.०३.२०२६)

## विवेचन

उपरोक्त दि.१६.०३.२०२६ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश गोसावी, वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल कार्यालय शहापूर यांचेवर समन्स बजावण्यात आले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २२.०४.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश गोसावी, वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल कार्यालय शहापूर अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

सदर प्रकरणी आयोगाने दि.१६.०३.२०२६ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश गोसावी, वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल कार्यालय शहापूर यांचेवर दि.२२.०४.२०२६ रोजीच्या सुनावणीस उपस्थित राहणेबाबत समन्स बजावण्यात आले होते. तथापि वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शहापूर पोलीस ठाणे कडून श्री.शैलेश गोवासी यांना समन्स ची बजावणी झाल्याबाबतची पावती आयोगास प्राप्त झालेली नाही. याप्रकरणात माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (३) (क) अंतर्गत चौकशी करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे. या चौकशीत साक्ष देण्यासाठी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश गोसावी, वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल कार्यालय शहापूर यांची उपस्थित आवश्यक आहे. त्यामुळे पुढील सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश गोसावी, वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल कार्यालय शहापूर यांचेवर पुन्हा समन्स बजावणे योग्य होईल. या समन्सची बजावणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शहापूर पोलीस स्टेशन, शहापूर व पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण यांचे मार्फत करणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. याप्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश गोसावी, वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल कार्यालय शहापूर यांची साक्ष घेणे अतिशय आवश्यक असल्याने, त्यांची उपस्थिती आवश्यक आहे. या चौकशी करिता उपस्थित राहणेस्तव उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठ यांनी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश गोसावी, वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल कार्यालय शहापूर यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (३) (क) अन्वये तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता अनुषंगाने आयोगास प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन पुढील सुनावणीस उपस्थित राहणेबाबत समन्स काढण्यात यावे. सदर समन्सची बजावणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शहापूर पोलीस स्टेशन, शहापूर व पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण यांचे मार्फत करावी.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०८.०६.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २२ एप्रिल, २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ, कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर,
नवी मुंबई ४०० ६१४.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शैलेश बाळू गोसावी,
वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, शहापूर,
शहापूर-आसनगांव रोड, जुना आग्रा रोड, आसनगांव,
मु.पो.ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१. **यांचे मार्फत रवाना.**

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ